॥ सा विद्या या विमुक्तये ॥
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**
**"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)**
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++'grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

आज़ादी का अमृत महोत्सव

**MEETING & ELECTION SECTION**

| Phone : (02462) 229246<br>Fax : (02462) 229572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|

प्राचार्यांमधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी माहिती पाठविण्याबाबत...

## अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. अधिसभेचे नव्याने गठण करावयाचे आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2)(o) नुसार प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून १० प्राचार्य निवडून द्यावयाचे आहेत. त्या अनुषंगाने प्रस्तूत विद्यापीठाशी सर्व संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थामधील पुर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संचालकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण तयार करावयाचा आहे.

तरी प्रस्तूत विद्यापीठाशी सर्व संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत कार्यरत असलेल्या सर्व मान्यताप्राप्त प्राचार्यांची/संचालकांची आवश्यक ती सर्व माहिती यासोबतच्या विहित केलेल्या नमून्यात भरून **e-mail : election@srtmun.ac.in** या मेलवर **word and pdf file** मध्ये दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत पाठवून हॉर्ड कॉपीची प्रत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभा व निवडणूक विभागात दिनांक ०४/०७/२०२२ सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.

मान्यताप्राप्त प्राचार्यांच्या गटामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी, महाराष्ट्र शासन राजपत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेतील पात्रता शर्ती, विहित नमुना या सोबत जोडलेले आहेत.

मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्या माहितीसोबत खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित किंवा स्वसाक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

१. प्राचार्य/संचालक म्हणून विद्यापीठाच्या मान्यतेची छायांकित प्रती.
२. प्राचार्य/संचालक मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास जातीच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
३. नावात बदल झाला असल्यास नवीन नावाने नोंदणी करण्यासाठी शासन राजपत्र किंवा नवीन नाव असलेले आधार कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा अर्जासोबत जोडावा.

वरीलप्रमाणे माहिती विहित मुदतीत प्रस्तूत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभा व निवडणूक विभागात पाठवावी. ज्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या प्राचार्यांची/संचालकांची माहिती विहित मुदतीत सभा व निवडणूक विभागात प्राप्त होणार नाही, त्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील प्राचार्य/संचालकांच्या नावाचा संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व परिसंस्थांच्या मान्यताप्राप्त संचालकांनी मिळून बनलेल्या निर्वाचक गणामध्ये समावेश होणार नाही, त्यास सबंधित महाविद्यालये/परिसंस्थेचा सादरकर्ता सर्वस्वी जबाबदार राहील.

जा.क्रं. : सभा व निवडणूक/२०२२–२३/97
दिनांक : ०३/०६/२०२२

**कुलसचिव तथा**
**निवडणुक निर्वाचन अधिकारी,**
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

प्रति,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे, स्वायत्त महाविद्यालयांचे, मान्यताप्राप्त परिसंस्थांचे सर्व मा.प्राचार्य व मा.संचालक

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17 Sep. 94 Nanded

| विहीत नमूना |
|---|

| फोटो |
|---|

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
## विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य/संचालक यांची माहिती द्यावयाचा नमूना

१) संस्थेचे नाव : ..........................................................................

२) महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व पत्ता : ..........................................................................
..........................................................................

३) महाविद्यालयाचा संकेतांक क्रमांक (College Code) : ..........................................................................

४) प्राचार्य/संचालकांचे नाव : ..........................................................................
(देवनागरी लिपीत) आडनाव प्रथम
(इंग्रजीत) आडनाव प्रथम ..........................................................................

५) जन्म तारीख : ..........................................................................

६) जातीचा प्रवर्ग (मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास जातीचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडावी) : ..........................................................................

७) प्राचार्य/संचालक म्हणून विद्यापीठ मान्यतेची तारीख व पत्र क्रं. (मान्यता पत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत सोबत जोडावी ) : ..........................................................................
..........................................................................

८) दूरध्वनी क्र.भ्रमणध्वणी क्र. व ई.मेल आय.डी
दूरध्वनी क्रं. : ..............................................
भ्रमणध्वनी क्र. : ..............................................
ई–मेल आयडी : ..............................................

९) शैक्षणिक माहिती : ..........................................................................

| | परीक्षा | विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | विषय |
|---|---|---|---|---|
| पदवी | | | | |
| पदव्युत्तर पदवी | | | | |
| संशोधनात्मक पदवी | | | | |
| इतर | | | | |

१०) अनुभव :

| | | |
|---|---|---|
| अ) | पदवी वर्गास शिकविण्याचा | .......... ते .......... एकूण .......... वर्ष ....... महिने |
| ब) | पदव्युत्तर वर्गास शिकविण्याचा | .......... ते .......... एकूण .......... वर्ष ....... महिने |

प्रमाणित करण्यात येते की, वरील प्रमाणे दिलेली माहिती बरोबर व सत्य असून ती मी संबंधीत कागदपत्रे तपासून दिलेली आहेत अशी हमी देतो.

प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी — शिक्का — अध्यक्ष/सचिव यांची स्वाक्षरी
नाव :

१) ज्या प्राचार्य/संचालक यांच्या नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता आहे अशाच प्राचार्य/संचालकांची माहिती वरील नमून्यात पाठवावी.
२) ज्या महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य/प्रभारी संचालक असतील त्यांची नावे निवडणुकीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी**

कलम २(१७) **'प्राचार्यांचा गट'** याचा अर्थ, जे पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्यांनी व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संचालकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

कलम २(४४) **'प्राचार्य'** याचा अर्थ, विद्यापीठाने प्राचार्य म्हणून यथोचितरीत्या मान्यता दिलेला अध्यापक, असा आहे.

कलम 28(2)(o) **'अधिसभा'**

प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) किंवा, यथास्थिति, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाने अधिस्वीकृती दिलेल्या संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे दहा प्राचार्य, त्यांपैकी प्रत्येकी एक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागसवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई दिनांक २८ एप्रिल २०१७ अन्वये अधिसूचनेतील मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात पात्रता शर्ती**

कलम 28(2)(o) **'अधिसभा'**

**प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले—**

(क) प्राचार्य म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,

(ख) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा,

(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.

**कुलसचिव तथा**
**निवडणुक निर्वाचन अधिकारी,**
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**